1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

SUBSCRIBE

• वर्ष : ०३ • अंक : १६५ • पुणे • बुधवार, दि. ०४ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313





विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण व निवासी सुविधेची सुवर्णसंधी 3





श्री. लक्ष्मण साबळे यांना शिव सन्मान पुरस्कार जाहीर 4


## ठळक बातम्या

### इराणी महिलेची पर्स लंपास

पुणे (आरंभ पर्व) : कोंढव्यातील कौसरबाग परिसरात रमजानानिमित्त विविध वस्तूंच्या स्टॉलवर खरेदीसाठी गेलेल्या इराणी महिलेची पर्स चोरून नेल्याची घटना घडली. पर्समध्ये १०० अमेरिकन डॉलर, भारतीय चलन तसेच सोन्याची अंगठी, असा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. याबाबत एका ३२ वर्षीय महिलेने कोंढवा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलांनी बुरखा परिधान केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोंढव्यातील कौसरबाग परिसरात रजमानिमित्त विविध वस्तूंची विक्री करणारे स्टॉल लावण्यात आले आहेत. तक्रारदार महिला मूळची इराणची आहे. व्यावसायिक व्हिसावर ती भारतात आली असून, गेल्या दहा वर्षांपासून ती भारतात वास्तव्य करत आहे. दि. २८ फेब्रुवारी महिला कोंढव्यातील कौसरबागेत असलेल्या नबाब मोहल्ला येथे खरेदीसाठी आली होती. एका स्टॉलवर इराणी महिला थांबली होती. त्यावेळी बुरखा परिधान केलेल्या दोन महिला तेथे आल्या. इराणी महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून बुरखा परिधान केलेल्या दोन महिलांनी पर्स चोरून नेली. पसार झालेल्या महिलांचा शोध घेण्यात येत असून, पोलिसांनी कौसरबाग परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. पोलिस उपनिरीक्षक पंकज खोपडे तपास करीत आहेत.

### गर्डर कोसळून १५ तरुण-तरुणी जखमी

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील कोरेगाव पार्क मुंढवा रोडवर रॉयर फार्ममध्ये होळीच्या कार्यक्रमात लाईटचा गर्डर पडून १५ ते १६ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. यातील जखमींना रुग्णालयात दाखल केलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. एकाची प्रकृती गंभीर असल्याचं सांगण्यात येत आहे. महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या उत्साहत होळी साजरी केली जात आहे. अनेक ठिकाणी होळीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेय. दरम्यान पुण्यात होळीच्या कार्यक्रमाला गालबोट लागलं आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, होळीनिमित्त कोरेगाव पार्क-मुंढवा रोडवर रॉयर फार्ममध्ये एका भव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एका खासगी कंपनीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी एक हजार पेक्षा जास्त तरुण तरुणींनी हजेरी लावली होती. याच कार्यक्रमात अचानक लाइटचा गर्डर कोसळून दुर्घटना घडली आहे. गर्डर काही तरुणांच्या अंगावर पडल्यानं १५ ते १६ जण जखमी झाले आहेत. यात तरुण तरुणींचा समावेश आहे. गर्डर पडून जखमी झालेल्यांपैकी चौघांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. तर एकाची प्रकृती गंभीर असल्याचीही माहिती समोर येत आहे. याबाबत पोलिसांनी अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही.

# भरदिवसा अपहरण

## पोलिसांच्या नाकाबंदीत सुखरूप सुटका, कापूरहोळ येथील थरारक घटना

- **अपहरणकर्त्यांनी ऊसाच्या पिकांचा फायदा घेत घटनास्थळावरून काढला पळ**



**वाल्हे (दै. आरंभ पर्व)**

कापूरहोळ (ता.भोर) परिसर मंगळवारी (दि.३) अक्षरशः थरारून गेला. एका नामांकित व्यापाऱ्यांच्या १८ वर्षीय मुलाचे भरदिवसा अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं होते;मात्र जेजुरी पोलीस स्टेशन आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे काही तासांतच युवकाची सुखरूप सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी कापूरहोळ येथून काळ्या रंगांच्या (एक्स यु व्ही ७००) एम. एच. १२ एक्स इ ५३५३ या कारमधून युवकाला जबरदस्तीने घेऊन जाण्यात आले. हा प्रकार अचानक घडल्याने गावात एकच खळबळ उडाली. कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. तर ग्रामसुरक्षा यंत्रणेद्वारेही मदतीचा संदेश देण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी निरा पोलीस दूरक्षेत्राच्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या मदतीने जेऊर–निरा मार्गावर तात्काळ नाकाबंदी उभारली.नीरा औट पोस्टचे पोलिस उपनिरीक्षक रविराज कोकरे हरिश्चंद्र करे, प्रसाद कोळेकर यांनी तातडीने कारवाई करत अपहरण करण्याचा मार्ग बंद केला.संशयित वाहनाचा शोध सुरू असतानाच जेऊर (ता.पुरंदर) कडून पिसुर्टीकडे जाणारी एक संशयित कार पोलिसांच्या नजरेस पडली.पोलिसांनी वाहन अडवण्याचा प्रयत्न करताच चालकाने वेग वाढवला;मात्र अरुंद रस्ता आणि घाईगडबडीत कार शेजारील उसाच्या शेतात जाऊन कार अडकली.आणि परिस्थितीने नाट्यमय वळण घेतले.

दरम्यान, अपहरणकर्त्यांनी उसाच्या पिकांचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला; यावेळी पोलिसांनी तत्परतेने कारमधून युवकाला बाहेर काढत त्याची सुरक्षित सुटका केली. यानंतर जेजुरी पोलीस दुरस्खेत्रातील सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाकचौरे व त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली.



यानंतर युवकाला वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले असून तो सुखरूप असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. “पोलिसांनी तात्काळ नाकाबंदी केल्यामुळे मुलाची सुरक्षित सुटका शक्य झाली;आरोपींचा शोध सुरू आहे,” अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी दिली.

दरम्यान, अपहरणा मागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.आर्थिक वाद, खंडणी की वैयक्तिक वैर या सर्व शक्यतांचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि वाहनाच्या तपासातून महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या धाडसी कारवाईमुळे कापूरहोळ परिसराने सुटकेचा नि:श्वास टाकला असला, तरी आरोपींच्या अटकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

युद्धस्थितीच्या पार्श्वभूमीवर

# पुण्यात कडक सुरक्षा

**शहरात सुमारे १२० ते १२५ इराणी नागरिक वास्तव्यास**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली असून पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. शहरातील संवेदनशील भाग, धार्मिक स्थळे तसेच गर्दीच्या ठिकाणी विशेष गस्त घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आखातातील परिस्थिती लक्षात घेता पोलिस प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून नियमित तपासणी मोहीम सुरू केली आहे. संशयास्पद व्यक्ती अथवा वस्तू आढळल्यास नागरिकांनी त्वरित आपत्कालीन क्रमांक ११२ वर किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी केले आहे. दरम्यान, पुणे शहरात सध्या अंदाजे १२० ते १२५ इराणी नागरिक वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. पर्यटन, व्यवसाय, वैद्यकीय उपचार तसेच शैक्षणिक कारणांमुळे हे नागरिक शहरात आले आहेत. यापैकी सुमारे २५ ते ३० इराणी महिलांनी भारतीय नागरिकांशी विवाह केला असून त्या शहरात स्थायिक आहेत. तसेच, जवळपास ६० इराणी विद्यार्थी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत आहेत. इराणी विद्यार्थ्यांच्या व्हिसाची मुदत संपत असल्यास ती वाढविण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाणार असल्याचे विशेष शाखेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून संबंधित विद्यार्थी व नागरिकांशी थेट संवाद साधून प्रक्रिया सुलभ करण्यात येणार आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही प्रशासनाने आवाहन केले आहे.

## विद्यार्थिनीवर सोशल मीडियावर छळ, पीडितेची पोलिसांत तक्रार

**बारामती (दै. आरंभ पर्व)**

अल्पवयीन विद्यार्थिनीला वारंवार गाठत तिची भेट घेणाऱ्या तरुणाला तरुणीने प्रतिसाद देण्याचे बंद करताच त्याच्या सोशल मीडिया खात्यावरील स्टोरीला संबंधित विद्यार्थिनीचे फोटो ठेवत तिचा विनयभंग केला. याप्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी त्याच्याविरोधात बाललैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियमासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. निखिल जांबले (रा. साबळेवाडी, शिर्सुफळ, ता. बारामती) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी पीडितेने फिर्याद दाखल केली. सन 2023 पासून हा प्रकार सुरू आहे. त्या वेळी निखिलने तिच्या इन्टाग्रामवर मेसेज केला होता. हे दोघे इन्स्टाग्रामवरून बोलत होते. काही दिवसांनी त्याने तिचा मोबाईल क्रमांक मागितला. तो चांगल्या ओळखीचा असल्याने तिने तो दिला. त्यानंतर



तो तिच्याशी फोनवर बोलू लागला. काही दिवसांनंतर ती बारामतीत शिक्षणासाठी येऊ लागल्यानंतर तो तिला भेटण्यासाठी शाळेबाहेर येऊ लागला. 2024 मध्ये तिने बारामतीजवळ एका महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर ती महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहण्यास आली. त्या वेळी या दोघांमध्ये बोलणे होत होते. एकेदिवशी त्याने तिथे जात, ‘तू माझ्यासोबत चल,’ असे म्हणत तिच्या मनाला लज्जा उत्पन्न केली. परंतु, शिक्षण सुरू असल्याने तिने ही बाब कोणाला सांगितली नाही. त्याच्याशी तिने बोलणे बंद केले. तरीही तो तिला व्हॉट्सअॅपवर मेसेज करीत होता.


## पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसचा निर्णय

सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्ष निवड प्रक्रियेला पार्थ यांनी दांडी मारल्यानं चर्चांना उधाण

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आहे. मात्र या कार्यक्रमाला पार्थ पवार अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं.

राज्यसभेसाठी पार्थ पवार यांची निवड - गेल्या आठवड्यात झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटी बैठकीत पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. 16 मार्च रोजी महाराष्ट्रातील सात रिक्त जागांसाठी राज्यसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून पार्थ पवार उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचं



प्रफुल पटेल यांनी स्पष्ट केलं. या निर्णयामुळे पार्थ पवार यांना राज्याच्या राजकारणाऐवजी थेट दिल्लीतील संसदीय राजकारणात संधी देण्याचं निश्चित झालं आहे.

अनुपस्थितीमुळे चर्चांना उधाण - सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीच्या कार्यक्रमात पार्थ पवार दिसून न आल्यानं विविध तर्क-वितर्कांना सुरुवात झाली.

### पार्थ पवार यांचा राजकीय प्रवास

- **राजकारणात प्रवेश (2019): 2019 च्या लोकसभा निवडणुकीतून पार्थ पवार यांनी सक्रिय राजकारणात पाऊल ठेवले.**
- **पहिली निवडणूक आणि पराभव : मावळ मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवली; मात्र शिवसेनेचे श्रीरंग बारणे यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला.**
- **संघटनात्मक कामात सक्रिय : त्यानंतर त्यांनी थेट निवडणूक लढवली नाही; परंतु पक्षाच्या संघटनात्मक आणि धोरणात्मक कामात ते सक्रिय राहिले.**
- **पडद्यामागील भूमिका : प्रचार नियोजन, रणनीती आखणी आणि बैठकींमध्ये त्यांचा सहभाग कायम राहिला. राज्यसभेच्या माध्यमातून पार्थ पवार संसदीय राजकारणात नवी सुरुवात करणार आहेत.**

संघटनेत त्यांना मोठी जबाबदारी, विशेषत: राष्ट्रीय महासचिवपद दिले जाईल, अशी चर्चा आधीपासून होती. मात्र महत्त्वाच्या कार्यक्रमाला ते गैरहजर राहिल्यानं प्रश्न उपस्थित झाले. कार्यक्रमानंतर पत्रकारांनी प्रफुल पटेल यांना याबाबत विचारलं असता त्यांनी राज्यसभेची उमेदवारी जाहीर करत या चर्चांना पूर्णविराम दिला.

# यूएईनं दिलं २६ हजारांचं ‘सॉरी गिफ्ट’

**दुबईत अडकलेल्या कोल्हापूरकरांचा जीव मुठीत घेऊन परतीचा प्रवास**



**कोल्हापूर(दै. आरंभ पर्व)**

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील तीव्र संघर्षामुळं दुबईसह आखाती देशांतील विमानसेवा पूर्णपणे विस्कळीत झाली. याचा फटका जगभरातील पर्यटकांसह कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरीमधील 23 पर्यटकांनाही बसला. कोल्हापूरच्या हातकणंगले तालुक्यातील हुपरी गावचा हा प्रवासी ग्रुप युद्धजन्य परिस्थितीतून जीव मुठीत घेऊन मायदेशी परतला आहे. 'करवीर निवासिनी आई अंबाबाईचा आशीर्वाद म्हणूनच आम्ही आमच्या घरी सुखरुप परतू शकलो. आम्ही परतलो असून दुबईसह इतर ठिकाणी अडकलेल्या सर्वांनाच भारत सरकारनं परत आणावं,' अशी भावना या कोल्हापूरकरांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे परतीच्या मार्गावर लागल्यानंतर दुबई प्रशासनानं दिलगिरी म्हणून ग्रुपमधील प्रत्येकाला 26 हजार रुपयांची भेट दिली आहे.

अमेरिका-इस्रायलनं इराणच्या विविध भागांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले चढवले. तर इराणनं प्रत्युत्तर देत अमेरिकन एअरबेसवर निशाणा साधला. यानंतर इराणनं आपली हवाई हद्द बंद केल्याचं जाहीर केलं. याचा परिणाम दुबई, अबु धाबी आणि शारजाह विमानतळांवर झाला. मुंबई-पुणे ते दुबईची उड्डाणं रद्द झाल्यामुळं अनेक भारतीय पर्यटक अडकले. यात महाराष्ट्रातील नागरिकांचा समावेश आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं 28 फेब्रुवारीला विमान कंपन्यांना इराण, इस्रायल, लेबनॉन, सौदी अरेबिया आदी देशांच्या हवाई हद्दी टाळण्याचे निर्देश दिले. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनीही याबाबत सांगितलं होतं की, 'आखाती देशांत अडकलेल्या कोल्हापूरकरांची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडं आहे. ते सुरक्षित आहेत.'

हुपरीतील 23 जणांचा पर्यटन ग्रुप दुबईत हॉटेलमध्ये अडकला होता. हे सर्वजण 23 तारखेला कोल्हापुरातून दुबई फिरण्यासाठी गेले होते. महिला, वृद्ध आणि लहान मुलांचा समावेश असलेला हा ग्रुप दुबईमध्ये पर्यटनाचा आनंद होता. अचानकच रात्री बारा वाजता सर्वांच्या मोबाईलवर आहे. त्या ठिकाणी सुरक्षित राहण्याचे अलर्ट मेसेज आले. "मोबाईलवर आलेल्या अलर्ट मेसेजमुळं आम्ही सर्वजण घाबरुन गेलो होतो. यातच दुसऱ्या दिवशी सकाळी हॉटेलच्या आजुबाजूला तीन जागी स्फोट झाले. त्यामुळं आम्ही आणि अजून 23 जणांचा एक ग्रुप असे सर्वजण घाबरतच दुपारी जेवणासाठी बाहेर पडलो. तेव्हाही एका बिल्डिंग मागून स्फोटामुळं प्रचंड मोठा धुराचा लोट येताना आम्हाला नजरेस पडला. आम्ही सर्वजण प्रचंड घाबरलो होतो. आमच्या पाठीशी देव असल्यानं परत आलो, असं आम्हाला वाटत आहे." अशी प्रतिक्रिया दुबईतून परतलेले पट्टणकोडोली गावचे प्रकाश जाधव यांनी दिली.




## थोडक्यात पण महत्वाचे




### खेडशिवापूरमध्ये सोनल वाईन्समधून दीड लाखांची रोकड लंपास

- शटर वाकवून चोरट्याची मध्यरात्री एंट्री
- सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास वेगात

खेडशिवापूर (आरंभ पर्व) : (ता. हवेली) : राजगड पोलीस ठाणे हद्दीतील सोनल वाईन्स येथे अज्ञात चोरट्याने मध्यरात्री घरफोडी करून तब्बल १ लाख ४८ हजार ८०० रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. १ मार्च रोजी रात्री ११.३० ते २ मार्च रोजी सकाळी ७.४५ या कालावधीत चोरट्याने दुकानाचे शटर वाकवून आत प्रवेश केला. दुकानातील विविध काउंटरमध्ये ठेवलेली रोकड चोरून नेण्यात आली. चोरीस गेलेल्या रकमेत ₹२००, ₹१००, ₹५०, ₹२०, ₹१० दराच्या नोटांसह नाणी व बदलासाठी ठेवलेल्या फाटक्या नोटांचा समावेश आहे. याप्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९५/२०२६ अन्वये BNS कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी दीपक शंकर जगदाळे (वय ४०, रा. गराडे, ता. पुरंदर) यांनी तक्रार दिली आहे. पोलीस निरीक्षक गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पाटील पुढील तपास करीत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. लवकरच आरोपीला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, रात्रीच्या गस्तीत वाढ करावी, अशी मागणी स्थानिक व्यापाऱ्यांनी केली आहे.




### स्टिहल इंडियाकडून देशव्यापी ‘परिवर्तन यात्रा’चा शुभारंभ

बारामती(आरंभ पर्व) : भारतीय शेतीला तांत्रिक बळकटी देत यांत्रिकीकरणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने स्टिहल इंडिया तर्फे कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके), बारामती येथे ‘किसान सन्मान’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत शेतीत मोलाचे योगदान देणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास परिंद प्रभू देसाई (व्यवस्थापकीय संचालक, स्टिहल इंडिया), शोभित बहेल (विपणन संचालक), प्रद्युम्न चतुर्वेदी (व्यापार विपणन व्यवस्थापक) तसेच राजेंद्र पवार (अध्यक्ष, कृषी विकास ट्रस्ट) आणि केव्हीके बारामतीचे वरिष्ठ अधिकारी व कृषी वैज्ञानिक उपस्थित होते. शेतकरी, कृषी तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान श्री. देसाई यांनी वाढती अन्नधान्याची मागणी, मजूरांची कमतरता आणि कार्यक्षमतेची गरज लक्षात घेता यांत्रिकीकरण ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. अत्याधुनिक आणि सुरक्षित यंत्रसामग्रीद्वारे शेतकऱ्यांची उत्पादकता व नफा वाढविण्यासाठी स्टिहल इंडिया कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

*विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी*

### कोमल नवले यांचा पुढाकार

**विद्यार्थ्यांसमवेत भोजन करत दिलखुलास बातचीत**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ (नऱ्हे, वडगाव बु., धायरी) येथील महापालिका शाळांना नगरसेविका सौ.कोमल सारंग नवले यांनी दिलेली भेट ही केवळ औपचारिक पाहणी नव्हती, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी घेतलेली मनापासूनची जबाबदारी होती.



पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण समिती सदस्या म्हणून त्यांनी शैक्षणिक सुविधा, स्वच्छता व्यवस्था आणि मध्यान्ह भोजनाचा सखोल आढावा घेतला. इंदुमती दळवी शाळा व नारायणराव नवले शाळा येथे भेट देत त्यांनी वर्गखोल्या, स्वच्छतागृहे आणि परिसराची तपासणी केली. विद्यार्थ्यांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण मिळावे यासाठी आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्या म्हणाल्या, “विद्यार्थ्यांसोबत बसून जेवताना त्यांच्या मनातील निरागस विश्वास जाणवला. हीच माझ्या कामाची खरी प्रेरणा आहे.”

“प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण, स्वच्छ परिसर आणि पौष्टिक आहार मिळणे हा त्याचा मूलभूत हक्क आहे. हा हक्क जपण्यासाठी मी कायम प्रयत्नशील राहीन.” असे त्यांनी सांगितले..

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कोमल नवले यांची ही जिव्हाळ्याची धडपड निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

#### विद्यार्थ्यांसमवेत भोजन



सर्वाधिक लक्षवेधी ठरला तो क्षण म्हणजे कोमल नवले यांनी विद्यार्थ्यांसोबतच जमिनीवर बसून शालेय मध्यान्ह भोजन घेतलेला प्रसंग. कोणताही औपचारिक दिखावा न करता त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये मिसळून त्यांच्या ताटातील अन्नाची गुणवत्ता स्वतः अनुभवली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आपलेपणाचा भाव पाहून वातावरण भावूक झाले.

# व्यंकटेश शर्विल परिसरात नियोजित उद्यानाचे भूमिपूजन उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ (नऱ्हे-धायरी-वडगाव बुद्रुक-वडगाव खुर्द) येथील व्यंकटेश शर्विल सोसायटी लगत, सर्व्हे नं. २६, धायरी येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने साकारण्यात येणाऱ्या आधुनिक उद्यानाच्या कामाचा भूमिपूजन समारंभ उत्साहात पार पडला.

नवनिर्वाचित नगरसेवकांच्या प्रयत्नातून होणाऱ्या या गार्डनचे भूमिपूजन खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर आणि पुणे शहर भाजपाचे अध्यक्ष धीरजजी घाटे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून कामास प्रारंभ करण्यात आला.





सुमारे पाच एकर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या उद्यानाची मागणी नऱ्हे-धायरी परिसरातील नागरिकांकडून दीर्घकाळापासून होत होती. वाढती लोकवस्ती, लहान मुलांसाठी खेळण्याची सुरक्षित जागा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर हे उद्यान भविष्यात परिसरातील प्रमुख विरंगुळा केंद्र ठरणार आहे. गार्डनमध्ये चिल्ड्रन्स पार्क, ओपन जिम, चालण्यासाठी प्रशस्त ट्रॅक, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष बैठक व्यवस्था, हिरवळ आणि आकर्षक फाउंटन अशा आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्रस्ताविक भाषणात नगरसेवक हरिदास चरवड यांनी उद्यानाचे महत्त्व अधोरेखित करत नऱ्हे-धायरी भागातील पाणीटंचाईचा प्रश्न उपस्थित केला. याकडे तातडीने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी आमदार तापकीर आणि शहराध्यक्ष घाटे यांच्याकडे केली.

उद्घाटनप्रसंगी आमदार भीमराव तापकीर यांनी हे गार्डन वर्षभरात पूर्ण करण्याचा संकल्प जाहीर करत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच पाणीपुरवठा व वाहतूक कोंडी समस्यांवरही लवकरच प्रभावी उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी शहरात अशा उद्यानांची निर्मिती आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, नगरसेविका जयश्रीताई भूमकर, नगरसेविका कोमलताई नवले, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, माजी स्वि.सभासद गंगाधर भडावळे, नगरसेवक अमर आवळे, मंडलाध्यक्ष यशवंत धायगुडे, सारंग नवले, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे, संतोष चाकणकर, यशवंत कांबळे, सचिन बेनकर, राजाभाऊ वाडेकर, सतीश कुटे, विद्याचरण मनेरे, आशुतोष पोकळे, सचिन मनेरे, गणेश कुटे, शहाजी वांजळे, केदार जाधव, सुनील चरवड, सुनील कांबळे, चंदन कड, कोमल कुटे, रमेश चरवड, राजाभाऊ कुंभारकर, बाळासाहेब पवार, अण्णा वाल्हेकर, राजाभाऊ कुंभार तसेच व्यंकटेश शर्विल सोसायटीचे पदाधिकारी परेश देशपांडे, नयन गिरमे, कल्याण सुडके आणि परिसरातील विविध सोसायट्यांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## “लोकशाहीचा चौथा स्तंभ” बाहेरच; पत्रकारांमध्ये संताप

**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारांना बजेट सादरीकरणावेळी प्रवेश नाकारल्याचा प्रकार उघडकीस आल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे मोठा वाद निर्माण झाला आहे. वार्षिक अंदाजपत्रक सादरीकरणासारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमात प्रसारमाध्यमांना बाहेर ठेवण्यात आल्याने पत्रकार संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महानगरपालिकेच्या सभागृहात बजेट सादर होत असताना अनेक पत्रकारांना मुख्य प्रवेशद्वारावरच अडवण्यात आले. “वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रवेश नाही,” असे कारण देण्यात आल्याचे समजते. त्यामुळे काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. पत्रकारांनी या घटनेचा निषेध नोंदवत, “लोकशाहीत पारदर्शकता अपेक्षित असताना माध्यमांना दूर ठेवणे म्हणजे माहिती लपविण्याचा प्रयत्न आहे का?” असा सवाल उपस्थित केला. बजेटमधील तरतुदी, विकासकामांची दिशा आणि नागरिकांवरील आर्थिक परिणाम याबाबत माहिती देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## विकासाचे राजकारण जपणाऱ्या तत्त्वनिष्ठ नेतृत्वाला अखेरचा निरोप

**ज्ञानोबा तात्या जोरी यांचे निधन; गावावर शोककळा**

**मालखेड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

गावाच्या विधायक विकासाचे स्वप्न डोळ्यांत साठवून ते सत्यात उतरवण्यासाठी आयुष्यभर झटणारे, सर्वसमावेशक विचारांचे ज्येष्ठ नेते मानसिक ज्ञानोबा जोरी (तात्या) यांच्या निधनाने मालखेड गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने केवळ कुटुंबीयांवरच नव्हे, तर संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



ज्ञानोबा तात्या यांचा स्वभाव ठाम, विचार स्पष्ट आणि भूमिका निडर होती. विकासाचे राजकारण हा त्यांचा मूलमंत्र होता. स्वार्थी आणि दुटप्पी राजकारणाला त्यांनी कधीही खतपाणी घातले नाही. भ्रष्ट प्रवृत्तीविरोधात त्यांनी नेहमीच रोखठोक भूमिका घेतली. त्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व गावात आदर्शवत मानले जात होते.

गावातील सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांची उपस्थिती नेहमीच प्रेरणादायी ठरायची. दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकांमध्ये ते आवर्जून सहभागी होत. मालखेड येथील भैरवनाथ मंदिर येथे थांबून येणाऱ्या ग्रामस्थांमध्ये मिसळून सेवा करण्याची त्यांची वृत्ती आजही सर्वांच्या डोळ्यांसमोर उभी आहे. त्यांनी अनेक कार्यकर्त्यांना एकाच विचारपीठावर आणत विधायक विकासासाठी एकजूट निर्माण केली. अनेक तरुणांना राजकारणाचे धडे देत समाजकारणाची जाण दिली आणि सकारात्मक बदलाची दृष्टी दिली. त्यांची शिकवण आणि विचार आगामी पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.

ज्ञानोबा जोरी यांची उणीव कायम जाणवत राहील; मात्र त्यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग आणि समाजाभिमुख विचार हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

## ‘खडकवासला जलाशय रक्षण अभियानाची’ यशस्वी द्वितपपूर्ती!

- खडकवासला जलाशय रक्षण मोहीम
- पर्यावरण संवर्धनाचा एक प्रेरणादायी दीपस्तंभ !



**अशाच प्रकारे रंगपंचमीच्या दिवशी म्हणजे 8 मार्चलाही हे अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंदु जनजागृती समिती मागील २३ वर्षापासून खडकवासला जलाशय रक्षण मोहीम राबवत आहे. धरण परिसरात जलाशय रक्षणाची अखंड, अविरत आणि प्रेरणादायी मोहीम खडकवासला ग्रामस्थ तसेच सामाजिक जाणीव असलेल्या पुणेकरांच्या सहभागातून प्रतिवर्षी होत असते. या मोहिमेचे यंदाचे हे २४ वे वर्ष आहे. भारतीय जनता पक्षाचे विद्यमान आमदार श्री भीमराव (आण्णा) तापकीर यांनी नारळ वाढवून मोहिमेचे उद्घाटन केले. धुलीवंदन आणि रंगपंचमी या दोन्ही दिवशी जलाशयाचे पावित्र्य अबाधित राहावे या संकल्पातून हिंदु जनजागृती समितीचे कार्यकर्ते, खडकवासला ग्रामस्थ, स्थानिक प्रशासन यांच्या सहकार्याने जलाशयाभोवती मानवी साखळी करून जलाशयाचे रक्षण करतात. समितीची ही मोहीम प्रतिवर्षी शतप्रतिशत यशस्वी झाली आहे. मोहीम सुरू झाल्यापासून एकाही व्यक्तीने जलाशयात प्रवेश केला नाही. निसर्गरक्षणाचा ध्यास, समाज प्रबोधनाची तळमळ, कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे ही मोहीम पर्यावरण संवर्धनाचा एक दीपस्तंभ ठरली आहे. पुणे शहर आणि परिसरातून आलेले २०० हून अधिक धर्मप्रेमी प्रबोधनात्मक फलक हातात धरून खडकवासला जलाशयाभोवती मानवी साखळी करून उभे होते. सकाळी ९ ते सायंकाळी ७ पर्यंत ही मोहीम राबवण्यात आली. या अभियानामध्ये स्थानिक ग्रामस्थांसह, पारगाव, दौंड, सासवड, तळेगाव, भोर,शिरवळ मांजरी, पुणे शहर अशा ठिकाणाहून जागरूक नागरिक सहभागी झाले होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे, खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार श्री भीमराव (आण्णा) तापकीर, पुणे महानगरपालिकेच्या भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे, भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री. दत्तात्रय कोल्हे, भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे माजी अध्यक्ष सारंग नवले, नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अतुल भोस, हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे श्री. सचिन घुले, हिंदु जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. धरणाच्या पाण्यात कोणी उतरू नये, तसेच पाण्याचे प्रदूषण करू नये यासाठी समिती निःस्वार्थपणे हे कार्य करत आहे. सर्व नागरिकांनी जलस्रोत सुरक्षित राहतील यासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन खडकवासला मतदारसंघाचे भाजप आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी केले. हिंदु जनजागृती समिती, खडकवासला ग्रामस्थ, पोलीस, प्रशासन,जागरूक नागरिक आणि समविचारी संघटना यांच्या वतीने हे अभियान राबवण्यात आले. प्रबोधनानंतर अनेक नागरिकांनी अभियानाचे विशेष कौतुक केले. पोलीस-प्रशासनाचेही या अभियानाला उत्तम सहकार्य लाभले.



## महिलांनी स्वत:साठी जगावे हाच उद्देश

- अवघ्या ५५५ रुपयांत श्री महालक्ष्मी इव्हेंटने घडवली महिलांना आनंदाची 'सहल'

**पुणे/नसरापूर (दै. आरंभ पर्व)**

दैनंदिन घरकाम आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या चक्रात अडकलेल्या महिलांना स्वतःसाठी आनंदाचे दोन क्षण जगता यावेत, या उदात्त हेतूने नारायणी ग्रुप, श्री महालक्ष्मी इव्हेंट सोनू जोशी आणि अदा द फॅशन स्टुडिओ निलम शेलार यांच्या वतीने नसरापूर येथील आर्यन रिव्हर वूड रिसॉर्टमध्ये एका विशेष 'वुमेन्स डे पार्टी बॅश'चे आयोजन करण्यात आले होते. अवघ्या ५५५ रुपयांच्या अल्प दरात एसी बस प्रवासापासून ते पूल पार्टीपर्यंतच्या शाही सुविधा उपलब्ध करून देत आयोजकांनी महिलांना जागतिक महिला दिनाची अनोखी भेट दिली. १ मार्च रोजी पार पडलेल्या या सहलीमध्ये सहभागी महिलांसाठी सकाळचा नाश्ता, दुपारचे चविष्ट जेवण आणि संध्याकाळचा 'हाय-टी' अशी चोख व्यवस्था करण्यात आली होती. केवळ जेवणच नव्हे, तर मनोरंजनासाठी डीजे पार्टी, पूल पार्टी आणि लाईव्ह गाण्यांच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच महिलांच्या उत्साहात भर टाकण्यासाठी विविध खेळांचे आयोजन करून त्यांना आकर्षक भेटवस्तूही देण्यात आल्या. नारायणी ग्रुपचे विशेष सहकार्य या कार्यक्रमासाठी लाभले. ह्या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे या संपूर्ण कार्यक्रमाचा अतिरिक्त खर्च आयोजकांनी स्वतः उचलला. पैशाअभावी कोणत्याही महिलेला अशा आनंदापासून वंचित राहावे लागू नये, म्हणून अत्यंत कमी नोंदणी शुल्क ठेवण्यात आले होते. "प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर मला हसू पाहायचे होते, ते स्वप्न या निमित्ताने पूर्ण झाले," अशा भावना आयोजकांनी व्यक्त केल्या.

# महाराष्ट्राला हिंदी नाही तर देशाला मराठी शिकण्याची गरज

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**


भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाणारी मुंबई आणि वेगाने वाढणारे औद्योगिक-शैक्षणिक केंद्र पुणे यांसारख्या शहरांमुळे महाराष्ट्र आज देशातील सर्वात मोठ्या रोजगारकेंद्रांपैकी एक बनला आहे. उद्योग, आयटी, चित्रपटसृष्टी, बांधकाम, शेती-प्रक्रिया, सेवा क्षेत्र. अशा असंख्य क्षेत्रांत देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक येथे येतात आणि कष्ट करून आपले व कुटुंबाचे आयुष्य घडवतात. अशा परिस्थितीत एक प्रश्न वारंवार उपस्थित होतो. जर अर्धा देश महाराष्ट्रात येऊन कष्ट करत असेल, तर देशाला मराठी शिकण्याची गरज नाही का?

**१) महाराष्ट्र: संधींचे प्रवेशद्वार**

महाराष्ट्रात दरवर्षी लाखो लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायासाठी स्थलांतर करतात. मुंबईतील आर्थिक क्रियाकलाप, पुण्यातील आयटी व ऑटोमोबाईल उद्योग, नाशिक-औरंगाबादमधील उत्पादनक्षेत्र, कोकणातील बंदरे. या सर्वामुळे राज्याचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान मोठे आहे. या सर्व घडामोडींमध्ये विविध भाषिक पार्श्वभूमीचे नागरिक सहभागी असतात. त्यामुळे बहुभाषिक सहजीवन ही महाराष्ट्राची ताकद ठरते; पण त्याचवेळी स्थानिक भाषेचा सन्मान व वापर यांचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो.

**२) भाषा म्हणजे केवळ संवाद नाही. ओळख आहे**

मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नसून ती संस्कृती, परंपरा आणि इतिहासाची वाहक आहे. संत साहित्य, लोकनाट्य, वाङ्मय, स्वातंत्र्यचळवळीतील योगदान. या सर्वांचा आत्मा मराठीत आहे. स्थानिक प्रशासन, कायदे, सामाजिक रचना आणि लोकजीवन समजून घेण्यासाठी मराठीचे ज्ञान उपयुक्त ठरते.




एखादा नागरिक जेव्हा ज्या राज्यात राहतो, तेथील भाषा शिकण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा तो त्या भूमीचा सन्मान करतो. त्यामुळे सामाजिक समन्वय वाढतो, गैरसमज कमी होतात आणि परस्पर आदर दृढ होतो.

**३) हिंदी की मराठी. विरोध नव्हे, संतुलन**

हा मुद्दा “हिंदी विरुद्ध मराठी” असा मुळीच नाही. हिंदी ही भारतातील संपर्कभाषा मानली जाते; अनेक राज्यांत ती व्यवहारासाठी सोयीची ठरते. परंतु महाराष्ट्रात राहणाऱ्या नागरिकांनी मराठी शिकणे ही नैसर्गिक अपेक्षा आहे.

जगभरात ज्या देशात/राज्यात आपण काम करतो, तेथील स्थानिक भाषा शिकणे हे सामान्य शिष्टाचार मानले जाते. मग भारतातच ही अपेक्षा चुकीची कशी ठरेल?

स्थानिक भाषा + संपर्कभाषा असे संतुलन राखले, तर राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल.

**४) रोजगार व प्रशासनात मराठीचे महत्त्व**

सरकारी कागदपत्रे, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायालयीन प्रक्रिया, पोलीस यंत्रणा. यांमध्ये मराठीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. कामगार, लघुउद्योजक, सेवा क्षेत्रातील कर्मचारी यांना दैनंदिन व्यवहारात मराठीचे ज्ञान उपयुक्त ठरते.

मराठी समजल्यास ग्राहकांशी संवाद सुधारतो, स्थानिक बाजारपेठेची समज वाढते आणि विश्वास निर्माण होतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्याही मराठी शिकणे फायदेशीर आहे.

**५) मराठी शिकणे अवघड नाही**

आज डिजिटल साधने, ऑनलाईन कोर्सेस, मोबाईल ॲप्स आणि स्थानिक वर्ग यांच्या माध्यमातून मराठी शिकणे सोपे झाले आहे. प्राथमिक पातळीवर संवाद साधता आला तरी सामाजिक स्वीकार वाढतो. स्थानिक सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्य संमेलन, नाटक-चित्रपट यांत सहभागी होताना भाषा आपोआप आत्मसात होते.

**६) राष्ट्रीय एकात्मतेचा नवा अर्थ**

“देशाला मराठी शिकण्याची गरज आहे” या विधानाचा अर्थ असा नाही की सर्वांनी मराठीच बोलावी; तर जिथे आपण राहतो, काम करतो, त्या भूमीची भाषा आणि संस्कृती स्वीकारावी. भारत हा विविधतेत एकता मानणारा देश आहे. प्रत्येक राज्याच्या भाषेला समान सन्मान मिळाल्यास खरी राष्ट्रीय एकात्मता घडेल. महाराष्ट्रात येणाऱ्यांनी मराठी शिकावी, तसेच महाराष्ट्रातील लोकांनी इतर भाषांचा आदर करावा. हे दोन्ही समान महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्र देशाच्या प्रगतीचे महत्त्वाचे इंजिन आहे. येथे येऊन कष्ट करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान अमूल्य आहे. परंतु ज्या मातीत आपण घाम गाळतो, तिची भाषा जाणून घेणे हे कर्तव्य आणि सन्मान दोन्ही आहे. मराठी शिकणे म्हणजे केवळ शब्द शिकणे नव्हे; तर महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाते जोडणे आहे. आणि जेव्हा प्रत्येकजण स्थानिक भाषेला सन्मान देईल, तेव्हा “एक भारत, श्रेष्ठ भारत” ही संकल्पना अधिक अर्थपूर्ण ठरेल.






दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

बुधवार, दि. ०४ मार्च २०२६












# २८ आणि २९ मार्चला महिला कुस्ती स्पर्धेचा थरार!

- चौथ्या विजेतेपदासाठी भाग्यश्री फंड उत्सुक
- ४२ जिल्ह्यांच्या संघांचे ४००हून अधिक खेळाडू सहभागी होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर येथे दिनांक २८ आणि २९ मार्चला चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले जाणार असून निर्झरा केअर फाऊंडेशन, सोलापूर या संस्थेकडे स्पर्धेचे संयोजनपद देण्यात आले आहे. या स्पर्धेत ४२ जिल्ह्यांच्या संघांचे ४००हून अधिक खेळाडू सहभागी होणार असून महिला महाराष्ट्र केसरी किताबासाठी भाग्यश्री फंड ही प्रमुख दावेदार आहे. यापूर्वी तिने तीन वेळा हा किताब जिंकला होता.

निर्झरा केअर फाऊंडेशनच्या संचालिका आणि संस्थापक सौ. स्वाती अळ्ळीमोरे-साखरे, केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, संघाचे सरचिटणीस योगेश दोडके यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ही स्पर्धा सोलापूर जिल्ह्यातील सिद्धेश्वर पेठ परिसरात असलेल्या हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या स्पर्धेसाठी ५० किलो, ५३ किलो, ५५ किलो, ५७ किलो, ५९ किलो, ६२ किलो, ६५ किलो, ६८ किलो, ७२ किलो तसेच महाराष्ट्र केसरी गट (६५ ते ७६ किलो) असे वजनी गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके दिली जाणार असून महाराष्ट्र केसरी किताब जिंकणाऱ्या महिला कुस्ती केलेला मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.

तीन वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या भाग्यश्री हिच्यापुढे अमृता पुजारी, प्रगती गायकवाड, अंकिता फटाले, वेदांतिका पवार यांचे आव्हान असणार आहे. भाग्यश्रीने स्पेनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या २० वर्षांखालील गटाच्या जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच थायलंडमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. गतवेळच्या महाराष्ट्र केसरी जेतेपदाच्या लढतीत भाग्यश्रीने अमृताला पराभूत करीत विजेतेपद मिळवले होते.

"पुरुषाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची दरवर्षी महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात मोठी उत्सुकता असते. तशीच महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धासुद्धा आपली छाप पाडते आहे. वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी निर्झरा केअर फाऊंडेशनच्या माध्यमातून चौथी महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित केली आहे. मी आणि आमची संघटना या आयोजनासाठी त्यांच्या सर्वतोपरी पाठीशी असू. तसेच मी या स्पर्धेला आवर्जून हजेरी लावेन," असे केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

स्वाती यांचे वडील सिद्धाराम साखरे हे स्वतः ज्येष्ठ कुस्तीपटू, पोलीस अधिकारी व समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी निर्झरा केअर फाऊंडेशनची २०२३मध्ये स्थापना केली. स्वाती अळ्ळीमोरे-साखरे म्हणाल्या की, "सोलापूर जिल्ह्यामध्ये कुस्तीसाठी चांगले नैपुण्य आहे. मात्र अव्वल दर्जाच्या सुविधा, आखाडे व स्पर्धांचे व्यासपीठ याअभावी या खेळाडूंना अपेक्षेइतके आंतरराष्ट्रीय दर्जाचे करिअर करता येत नाही, हे लक्षात घेऊनच आम्ही निर्झरा फाऊंडेशनतर्फे कुस्तीगिरांच्या विकासासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही ही महिलांची राज्य अजिंक्यपद स्पर्धा घेत आहोत."

## *धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी*

# मोफत शिक्षण व निवासी सुविधेची सुवर्णसंधी

### संकल्प इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचा पुढाकार

**नऱ्हे, पुणे (दै. आरंभ पर्व)**

भटक्या जमातींतील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी संकल्प इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून विशेष मोफत शिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे.






या अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासोबत निवासी (वसतिगृह) सुविधा देण्यात येणार असून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणपद्धती, शिस्तबद्ध वातावरण, तसेच शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गुणवंत विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहतात; अशा विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याबाबत माहिती देताना संस्थापक अध्यक्ष निलेश गिरमे म्हणाले की, "धनगर समाज हा परंपरेने कष्टकरी आणि भटक्या जीवनशैलीशी जोडलेला असल्यामुळे अनेक मुलांना शिक्षणाच्या संधी मर्यादित मिळतात. ही दरी कमी करण्यासाठी आणि समाजातील मुलांनीही डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक अशा विविध क्षेत्रांत पुढे यावे, या उद्देशाने आम्ही मोफत शिक्षण योजना सुरू केली आहे. आधुनिक इंग्रजी माध्यमातून शिक्षण, राहण्याची सोय, संस्कारमूल्यांवर आधारित वातावरण आणि सर्वांगीण विकास यांचा संगम विद्यार्थ्यांना येथे मिळणार आहे. शिक्षण हीच खरी समाज परिवर्तनाची ताकद आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा आणि समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सहकार्य करावे, ही आमची नम्र विनंती आहे."

**संस्थेच्या या उपक्रमामुळे धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची नवी दारे खुली झाली असून पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.**

**या संस्थेचा पत्ता : हर्षल कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. ४८/२६/५३, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, सिंहगड कॉलेज शेजारी, नऱ्हे, पुणे – ४१**

# वॅस्कॉन इंजिनिअर्सचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे सोबत सहयोग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जवळपास चार दशकांचा वारसा असलेल्या अग्रगण्य EPC आणि रिअल्टी क्षेत्रातील कंपन्यांपैकी एक वॅस्कॉन इंजिनिअर्स लिमिटेड (VASCONEQ) ने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे उत्कृष्टता केंद्राची उभारणी केली आहे. ही सुविधा सीओईपी कॅम्पसमधील निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये विकसित करण्यात आली असून एकूण बांधकाम क्षेत्र 18,000 चौ.फूट आहे. उत्कृष्टता केंद्राची निर्मिती बांधकाम, रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांशी संबंधित तंत्रज्ञानांच्या संशोधन, चाचणी आणि अंमलबजावणीस पाठबळ देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून करण्यात आली आहे. या सुविधा केंद्राचा काही भाग CREDAI सोबत विकसित करण्यात येणार आहे. तर दुसऱ्या भागात इंडियन प्लंबिंग असोसिएशन (IPA) यांच्या सहकार्याने अत्याधुनिक प्लंबिंग लॅब उभारण्यात येणार आहे. हे केंद्र लाईव्ह तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, पथदर्शी प्रकल्प, शैक्षणिक–औद्योगिक कार्यशाळा, संशोधन सहकार्य आणि ज्ञानाची देवाणघेवाण यांना सक्षम करेल.

## थोडक्यात पण महत्वाचे

### मराठी उद्योजकाची जपानमध्ये भरारी



**पुणे (आरंभ पर्व) : फिडेलने जपानमधल्या 30 वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या IM कॉर्पोरेशन या IT सल्लागार आणि सॉफ्टवेअर सर्व्हिस कंपनीमध्ये बहुमत हिस्सेदारी संपादित केली. या संपादनामुळे जपानमधील फिडेलच्या स्थानिक सेवा वितरण क्षमतेला बळकटी मिळेल. तसेच जपानी कंपन्यांसाठी फिडेलच्या एंटरप्राइज IT व AI-चालित सेवांच्या विस्तारास पाठबळ मिळेल. फिडेल ने IM कॉर्पोरेशन अधिग्रहित केल्याने भारत आणि-जपान यांच्यामधील सहयोगाला बळकटी मिळाली आहे, परिणामी जपानमधील परिचालन विस्तारण आणि AI-चालित विकासाला बळकटी देणे शक्य होईल. फिडेल, या जागतिक AI-चालित नेतृत्वाखालील एंटरप्राइझ B2B डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सर्व्हिसेस कंपनीने आज 30 वर्षांहून अधिक इंडस्ट्री अनुभव असलेल्या तसेच जपानमधील तंत्रज्ञान सल्लागार आणि DX सर्व्हिस पुरवणारी IM कॉर्पोरेशन कंपनी अधिग्रहित करण्याची घोषणा केली. या धोरणात्मक संपादनामुळे जपानमधील फिडेलची स्थानिक सेवा वितरण उपलब्धतेला बळकटी मिळाली असून जागतिक विस्तार आणि AI इनोव्हेशन रोडमॅपला चालना मिळाली आहे.**

# श्रीकृष्ण नीती आजही समाजासाठी गरजेची आणि दिशादर्शक - मयूर भावे

### नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे व्याख्यानमाला संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




कृष्ण नीती म्हणजे केवळ भगवान श्रीकृष्णाने कुरुक्षेत्राच्या रणांगणावर सांगितलेले विचार नाहीत तर श्रीकृष्णाचे संपूर्ण जीवन म्हणजेच कृष्ण नेते आहे. त्यासाठी श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्व समजून घेतले पाहिजे. श्रीकृष्णाचे सर्व गुण आपल्यामध्ये येणे शक्य नाही परंतु त्या पैकी एखादा गुण आपण आत्मसात करू शकतो श्रीकृष्ण विचार हे आजही समाजासाठी गरजेचे आणि दिशादर्शक आहे असे मत ज्येष्ठ विचारवंत मयूर भावे यांनी व्यक्त केले. नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या गरज कृष्ण नीतीची या विषयावरील व्याख्यानमालेत मयूर भावे बोलत होते. संस्थेचे वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवे आदि यावेळी उपस्थित होते. मयूर भावे म्हणाले, आजच्या काळामध्ये असलेला हिंसेचा अर्थ हा श्रीकृष्णाचा विचार नाही. श्रीकृष्णाचा हिंसेचा विचारवेगळा आहे. समाजाच्या हितासाठी आवश्यक असणारी हिंसा ही हिंसा ठरत नाही तर तो पराक्रम ठरतो हेच आपण महाभारतातून शकतो. आजच्या काळामध्ये अहिंसेचा चुकीचा अर्थ लावला जात आहे परंतु श्रीकृष्णाचे जो पराक्रमाचा विचार आणि शिकवण आहे ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

भूतकाळाचे विस्मरण होऊ न देता आणि भविष्याचा वेध मनामध्ये ठेवून वर्तमान काळ आपल्या हातातून निसटू न देणे म्हणजेच श्रीकृष्ण नीती आहे. श्रीकृष्ण नीती ही कृतीपेक्षा उद्देशाला महत्त्व देते. त्यामुळे आपला उद्देश हा कायम चांगला आणि देशाप्रती योग्य ठेवला पाहिजे.


## SANKALP PRATISHTHAN'S

Sr. No. 146/6, Garmal, Near Tole chal, Dhayari, Pune 41104. Ph. No. 9022570791

### WALK IN INTERVIEW

- Applications are invited for the following posts on Adhoc (Non -Grantable) basis for the Academic year 2025 to 2026.
- Qualifications and norms are as per UGC Government of Maharashtra and SPPU rules.

**Sankalp college of Law, warje**

| Sr. No. | Post | Course/Subject | Vacant Post | Social Reservations |
|---|---|---|---|---|
| 1. | Asst. Professor | Law | 02 | open -01/sc-01 |
| 2. | Librarian | | 01 | Open to all -01 |
| Total : 3 | | | | |

**Sankalp college of BBA and BCA**

| Sr. No. | Post | Course/Subject | Vacant Post | Social Reservations |
|---|---|---|---|---|
| 1. | Asst. Professor | BCA | 02 | open -01/sc-01 |

- Date of Interview : 18/03/2026
- Time : 11.00 am onwards

Place : Pune

Date : 4 March 2026

Address : (For both colleges) : Dangat Enclave, Sr. No. 140/6, NDA road, back side of borikar hospital, Warje Malwadi. Phone No. 9022570791


## PUBLIC NOTICE

Mr. Shashikant Krushnanath Mulay, a member of the Shri Laxmi Vrindavan Co-operative Housing Society Limited having address at Survey No. 74 Hissa No. 6A and 6B, Mouje Dhayari, Taluka Haveli, Pune and holding Flat No C-402 in the building of the society, died on 12/04/2021 without making any nomination.

The society hereby invites claims or objections from the heir/ heirs or other claimants/objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15 (Fifteen) days from the publication of this notice, with certified true copies of such documents and other proofs in support of his/ her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims or objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/with the Secretary of the society between 10 A.M. to 5 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Sd/-
For and on behalf of
Shri Laxmi Vrindavan Co-operative
Housing Society Limited

Place: Pune
Date: 28th February 2026

Sd/-
Hon. Secretary

## ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे

**निविदा सुचना**

ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे यांचे तर्फे १५ वा वित्त आयोग / स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जि. प. पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार/निविदाधारक यांजकडून लिफाफा पद्धतीने खालील कामांची सीलबंद निविदा पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा वाटप ग्रामपंचायत आसखेड बु. ता. खेड जि. पुणे यांच्याकडून दि. ०४/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत देण्यात व स्वीकारण्यात येतील. व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. १३/०३/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालय आसखेड बु. ता. खेड जि. पुणे येथे उघडण्यात येतील किंवा लगतच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मौजे आसखेड बु.\|\| येथील स्मशानभूमिजवळ सार्वजनिक शौचालय यूनिट बांधकाम करणे / उभारणे | २,९९,९७०/- | ५००/- | ३०००/- | ३ महिने | स्वच्छ भारत मिशन ७०% व १५ वा वित्त आयोग ३०% |

अटी व शर्ती :

१) सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालय आसखेड बुद्रुक ता. खेड जि. पुणे येथे सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत सुट्टीचे दिवस वगळून स्वीकारल्या जातील.

२) निविदा स्वीकारणेचे व नाकारणेचे तसेच बदल करण्याचे सर्व अधिकार सरपंच / प्रशासक ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक यांस राहतील.

३) सदर निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा लगतच्या दिवशी उघडण्यात येतील.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक,
ता. खेड, जि. पुणे

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक,
ता. खेड, जि. पुणे

## ग्रामपंचायत हरीश्चंद्री, ता. भोर जि. पुणे

**जाहीर खुली बि - १ निविदा नोटीस**

ग्रा. पं. हरीश्चंद्री, ता. भोर, जि. पुणे यांचेकडून या जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ग्रा.पं.हरीश्चंद्री येथे स्वच्छ भारत मिशन + १५ वा वित्त आयोग (बंधीत निधी) ग्रा.पं.स्तर अंतर्गत खालील प्रमाणे कामे मंजुर असून सदर कामासाठी निविदा दि.०३.०३.२०२६ ते दि. १०.०३.२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रा.पं.कडे दाखल कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | अं. प. रक्कम/ साहित्य रक्कम | निविदा रक्कम (जि.एस.टी.सहीत) | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | हरीश्चंद्री जि. प. शाळा शौचालय बांधणे. | ३००००० | ११८ | ३००० | ६ महिने |
| २ | हरीश्चंद्री येथे द्रव कचरा व्यवस्थापन करणे. | ३२०८५६ | ११८ | ३२०८ | |

अटी व शर्ती -

१) निविदा फॉर्म व कामाच्या तसेच साहीत्य बाबतच्या अटी व शर्तीची माहिती ग्रा.पं. हरीश्चंद्री कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.

२) निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. ११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रा.पं.हरीश्चंद्री येथे पार पडेल.

३) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जि.एस.टी.प्रमाणपत्र झेरॉक्स व निविदा तसेच बयाणा रकमेचा डी.डी / धनादेश हा सरपंच ग्रा.पं.हरीश्चंद्री यांचे नावाने देय असावा त्याचप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं - साक्षांकित करून जोडावेत.

४) सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील.

५) कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल.

६) कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता जि.प.उपविभाग भोर यांचे राहिल.

७) साहीत्याचा दर्जा तपासून पुढील देयक अदा केले जाईल.

७) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.पं.हरीश्चंद्री यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत हरीश्चंद्री, ता. भोर जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत हरीश्चंद्री, ता. भोर जि. पुणे

## थोडक्यात पण महत्त्वाचे



### होळी सण उत्साहात; पारंपारिक पद्धतीने होळी साजरी

पुणे ग्रामीण (आरंभ पर्व) : फाल्गुन महिन्यातील रंगोत्सव असलेली होळी पुणे ग्रामीण भागात यंदा मोठ्या उत्साहात आणि पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. सिंहगड परिसर, शिवगंगा तसेच पानशेत भागात ग्रामस्थांनी एकत्र येत होळी प्रज्वलित करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. गावागावांत सायंकाळी विधिवत पूजा करून होळी प्रज्वलित करण्यात आली. शेतकरी, महिला, युवक आणि लहान मुलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत सणाची शोभा वाढवली. अनेक ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात, फुगड्या आणि पारंपारिक गाणी म्हणत सण साजरा करण्यात आला. होळीच्या निमित्ताने ग्रामस्थांनी एकमेकांना शुभेच्छा देत भेदभाव विसरून एकत्र येण्याचा संकल्प केला. काही ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवत स्वच्छता मोहिम आणि वृक्षसंवर्धनाचा संदेशही देण्यात आला. दुसऱ्या दिवशी धुळवड उत्साहात पार पडली. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी रंगांची उधळण करत आनंद साजरा केला. प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ग्रामीण भागातील पारंपरिक संस्कृती, एकोपा आणि उत्साह यांचे सुंदर दर्शन या होळी सणानिमित्त पाहायला मिळाले. पुणे ग्रामीण भागात साजऱ्या झालेल्या या रंगोत्सवाने सामाजिक सलोखा अधिक दृढ झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



### स्पिन अँड स्विंग क्रिकेट अकादमीचे पुण्यामधे उद्‌घाटन

पुणे (आरंभ पर्व) : समावेशक क्रीडा विकास आणि सामुदायिक उन्नतीसाठी सामायिक वचनबद्धतेला बळकटी देत, एएसके फाउंडेशन२४ आणि एसएमएल या संस्था एकमेकांचे भागीदारीत एकत्रित प्रयत्न करणार आहेत. पुण्यातील शिंदे हायस्कूल ग्राउंड येथे स्पिन अँड स्विंग क्रिकेट अकादमीचे उद्‌घाटन करण्यात आले. मजबूत सीएसआर दृष्टिकोनातून, या उपक्रमाचे उद्दिष्ट तरुण क्रिकेटपटूंना, विशेषतः वंचित पार्श्वभूमीतील मुलांना, संरचित प्रशिक्षण, व्यावसायिक मार्गदर्शन आणि दर्जेदार क्रीडा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांचे संगोपन करणे या हेतूनेच या संस्था एकत्रित आल्या आहेत.



### रंगपंचमीमध्ये उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा उत्स्फूर्त सहभाग

पुणे (आरंभ पर्व) : रंगपंचमीच्या निमित्ताने भोई प्रतिष्ठान तर्फे आयोजित ३१ वा रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. पुणे शहरातील अनाथ मुले, मूकबधिर विद्यार्थी, रस्त्यावरील गरजू मुले तसेच अंध विद्यार्थ्यांसमवेत दरवर्षीप्रमाणे यंदाही हा रंगोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी उपस्थित राहून विशेष मुलांबरोबर रंगांची उधळण केली. कार्यक्रमादरम्यान मुलांनी एकमेकांना विविध रंग लावत आनंद साजरा केला. भगवा, निळा, हिरवा, गुलाबी, पिवळा, नारंगी अशा विविध रंगांनी संपूर्ण परिसर रंगून गेला होता. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले. यावेळी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले, "उपमहापौर म्हणून मला या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले आणि या सर्व मुलांबरोबर रंगपंचमी खेळण्याची संधी लाभली, हे माझे भाग्य आहे. या चिमुकल्यांनी प्रेमाने मला रंग लावला. जसे हे विविध रंग एकत्र येऊन सुंदर चित्र तयार करतात, तसेच आपला भारत देश आणि आपले संविधान विविधतेने नटलेले आहे. अनेक जाती-धर्म, परंपरा आणि संस्कृती यांची सांगड घालत आपण एकात्मतेचा संदेश देत आहोत." कार्यक्रमात विविध सामाजिक संस्थांनी नाश्ता, पाणी व जेवणाची व्यवस्था केली होती. विशेष म्हणजे एका मुस्लिम कुटुंबीयांनी शिरकुरमा आणून सणात सहभाग नोंदवला. विविध धर्म व समाजघटक एकत्र येऊन हा रंगोत्सव साजरा करत असल्याचे चित्र पाहून सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा सुंदर संदेश देण्यात आला.

### बीएनसीएमध्ये विशेष कार्यशाळा संपन्न



पुणे (आरंभ पर्व) : जंगलातील संरक्षित देवराया हे प्राचीन ते अर्वाचीन, पर्यावरणीय ते जीवशास्त्रीय स्वरूपाचे जतन-संवर्धन असून त्याचे शास्त्रशुद्ध मोजमाप नकाशांच्या माध्यमातून करता येते. देवराईच्या या नैसर्गिक ठेव्यातून निसर्ग व मानव संबंध यावर शाश्वत पद्धतीचा अभ्यास करणे शक्य असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. निमित्त होते महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमधील (बीएनसीए) भूदृश्यकला वास्तूरचनाशास्त्र (लॅण्डस्केप आर्किटेक्चर) विभागातर्फे जंगलांमधील 'मूर्त स्वरूपातील पर्यावरणीय देवराया' यांच्यावरील कार्यशाळेचे.

# वन्यप्राण्यांच्या धडकेने होणाऱ्या अपघातांनाही 'मदत' द्या

- एकनाथ खडसेंची विधान परिषदेत आक्रमक मागणी
- 'जंगलातील मृत्यू'चा जाचक निकष रद्द करून १० लाखांचे सानुग्रह अनुदान तातडीने सुरू करण्याची सरकारकडे विचारणा



**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात किंवा धडकेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना मिळणारी १० लाख रुपयांची आर्थिक मदत तातडीने पुन्हा सुरू करावी, अशी जोरदार मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार एकनाथराव खडसे यांनी विधान परिषदेत केली. यावेळी त्यांनी सरकारच्या मदतीबाबतच्या 'विचित्र' निकषांवर बोट ठेवत प्रशासनाचा चांगलाच समाचार घेतला.

सभागृहाचे लक्ष वेधताना खडसे म्हणाले की, पूर्वी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास शासनाकडून सुरुवातीला ५ लाख आणि नंतर ती रक्कम वाढवून १० लाख रुपये मदत देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, मध्यंतरीच्या काळात तांत्रिक कारणे किंवा नियमावलीतील बदलांचा दाखला देत ही मदत देण्याची प्रक्रिया बंद करण्यात आली आहे. यामुळे पीडित कुटुंबे वाऱ्यावर असून त्यांना मदतीसाठी शासनाकडे चकरा माराव्या लागत आहेत.

सरकार सध्या मदतीसाठी जो तर्क लावत आहे, त्यावर खडसेंनी तीव्र आक्षेप नोंदवला. ते म्हणाले की, "सरकारच्या नियमानुसार, जर मृत्यू जंगलाच्या हद्दीत झाला तरच मदत दिली जाते. मात्र, वन्यप्राणी जंगलातून बाहेर येऊन रस्त्यावर धडक देत असतील आणि त्यात कुणाचा जीव जात असेल, तर त्याला 'जंगलातील मृत्यू' मानले जात नाही. वन्यप्राणी एका भागातून दुसऱ्या भागात जाताना रस्ता ओलांडणारच, मग अशा वेळी झालेला अपघात हा वन्यप्राण्यामुळेच झालेला असतो. अशा तांत्रिक कारणांसाठी मदत नाकारणे अत्यंत अन्यायकारक आहे." रस्त्याने प्रवास करताना रानटी डुक्कर, माकड किंवा नीलगाय यांसारख्या प्राण्यांनी दुचाकी किंवा चारचाकी गाड्यांना धडक दिल्याने अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अशा घटनांची संख्या मोठी असून, या अपघातांनाही वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांप्रमाणेच गृहीत धरून वारसांना १० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मिळावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. सभागृहाने या विषयाचे गांभीर्य ओळखून सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा एकनाथराव खडसे यांनी यावेळी व्यक्त केली.

**खडसे यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्या**

- तातडीची मदत: वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात किंवा धडकेत मृत्यू झाल्यास १० लाख रुपयांची मदत विनाविलंब मिळावी.
- व्याप्ती वाढवा: केवळ जंगलातच नाही, तर जंगलातून जाणाऱ्या रस्त्यांवर होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या अपघातांनाही या मदतीसाठी पात्र ठरवावे.
- प्रक्रिया सुटसुटीत करा: तांत्रिक कारणांमुळे थांबलेली मदत प्रक्रिया पुन्हा सक्रिय करून पीडितांना दिलासा द्यावा.

## Ai+ Smartphone कडून 'पल्स २' सादर




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

एआय प्लस स्मार्टफोन कंपनीने 'पल्स २' हा नवा दूरध्वनी संच सादर केला आहे. अधिक लोकांपर्यंत प्रगत तंत्रज्ञान परवडणाऱ्या किमतीत पोहोचवण्याच्या उद्देशाने हा संच विकसित करण्यात आला असून, विश्वासार्ह कार्यक्षमता, दिवसभर टिकणारी बॅटरी आणि सुलभ छायाचित्रण यांवर विशेष भर देण्यात आला आहे. या संचाची विक्री ११ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यापासून Flipkart या संकेतस्थळावर सुरू होणार आहे. विशेष प्रारंभिक ऑफरअंतर्गत ४ जीबी + ६४ जीबी प्रकाराची किंमत पहिल्या २४ तासांसाठी ५,९९९ रुपये, तर ६ जीबी + १२८ जीबी प्रकाराची किंमत ७,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. Madhav Sheth, मुख्य कार्यकारी अधिकारी, एआय प्लस स्मार्टफोन व 'नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीज'चे संस्थापक, म्हणाले, "पल्स १ ने तयार केलेल्या मजबूत पायावर आम्ही अर्थपूर्ण सुधारणा केल्या आहेत. सक्षम कॅमेरा, विश्वासार्ह बॅटरी आणि सुरुवातीपासूनच गुळगुळीत सॉफ्टवेअर अनुभव देण्यावर आमचा भर आहे. सुधारित पकड व आकर्षक रचनेसह हा संच हिरवा, निळा, गुलाबी, जांभळा आणि काळा या पाच रंगांमध्ये उपलब्ध आहे. एआय प्लस कंपनीने जुलै २०२५ मध्ये 'पल्स' आणि 'नोव्हा ५जी' मॉडेल्ससह भारतीय बाजारात प्रवेश केला होता.

*दैनिक 'आरंभपर्व'चे निवासी संपादक*

# श्री. लक्ष्मण साबळे यांना शिव सन्मान पुरस्कार जाहीर

**लाल महल येथे 'भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषद, महाराष्ट्र प्रदेश कमिटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात येणारा 'शिव-सन्मान पुरस्कार सोहळा २०२६' यंदा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या प्रतिष्ठेच्या पुरस्काराचे हे बारावे वर्ष असून, यंदाचा 'शिव-सन्मान पुरस्कार २०२६' दैनिक आरंभपर्वचे निवासी संपादक श्री. लक्ष्मण मारुती साबळे यांना जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक बांधिलकी जपत पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणे, जनसामान्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवणे आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेचा आदर्श निर्माण करणे या त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात येत असल्याचे परिषदेच्या वतीने सांगण्यात आले.

**श्री. लक्ष्मण साबळे यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या सन्मानामुळे दैनिक आरंभपर्वच्या कर्तृत्वात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी सायं. ५:४५ वाजता पुण्यातील कसबा पेठ येथील ऐतिहासिक वास्तू लाल महल येथे समारंभपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

रुग्ण हक्क परिषद गेली अनेक वर्षे आरोग्य क्षेत्रातील रुग्णांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देत असून, समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'शिव-सन्मान पुरस्कार' देऊन गौरवित आहे.



यंदाच्या सोहळ्याबाबत पुणेकरांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# जामनेर शहरात 'महास्वच्छता अभियान' संपन्न



**स्वच्छतेची सांख्यिकीय माहिती**

- स्वच्छ केलेला परिसर: १,९९,८०० स्क्वेअर मीटर.
- स्वच्छ केलेले रस्ते: ११.३ कि.मी. (दुतर्फा).
- संकलित कचरा: १९.०० टन (ओला कचरा: ७.६ टन, सुका कचरा: ११.४ टन).
- वाहनांचे सहकार्य: १२ ट्रॅक्टर व २ मालवाहू रिक्षा (प्रतिष्ठानतर्फे), तसेच नगरपालिकेतर्फे २ ट्रॅक्टर व ३ घंटागाड्या.

**जामनेर-सागर नानोटे (दै. आरंभ पर्व)**

पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगड भूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, आदरणीय डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान (रेवदंडा) तर्फे आज रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी संपूर्ण देशभर 'स्वच्छता हीच सेवा' हे महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. याच उपक्रमाचा भाग म्हणून जामनेर शहरातही मोठ्या उत्साहात स्वच्छता मोहीम राबवून अवघे शहर चकाचक करण्यात आले.

आज सकाळी ठीक ७:४५ वाजता या अभियानाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी जामनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. साधनाताई महाजन, उपनगराध्यक्ष डॉ. श्री. प्रशांत भाडे, जामनेर तालुका एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री. जितू पाटील, नगरसेवक श्री. महेंद्र बावस्कर, श्री. आतिष झाल्टे, श्री. सुभाष पवार, श्री. पप्पू पाटील यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मोहिमेत जामनेर परिसरातील १७ बैठकांमधील एकूण ६९२ श्रीसदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. प्रतिष्ठानच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे अवघ्या काही तासांत शहराचे रूप पालटले. संकलित केलेला सर्व कचरा तातडीने 'पहाडी बाबा' येथील डम्पिंग ग्राऊंडवर विल्हेवाटीसाठी जमा करण्यात आला. केवळ स्वच्छताच नव्हे, तर डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत वृक्षलागवड व संवर्धन, रक्तदान शिबिर, विहीर पुनर्भरण, शैक्षणिक साहित्य वाटप, व्यवसाय मार्गदर्शन, दिव्यांग व्यक्तींना मदत, बस थांबे निर्मिती आणि पाणपोई असे अनेक लोकोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातात. विशेष म्हणजे, हे कार्य केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. श्री सद्गुरूंच्या बैठकीच्या माध्यमातून समाजजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि मानवता धर्माची शिकवण देत नैतिक मूल्यांची जोपासणी करण्याचे मोलाचे कार्य प्रतिष्ठान करत आहे.

# स्नेहसंमेलन उत्सव साजरा



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड तालुक्यातील सरपंच वस्ती या ठिकाणी असलेल्या सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय या विद्यालयाचा 2025 -2026 स्नेहसंमेलनचा कार्यक्रम अति उत्साहात साजरा करण्यात आला, या कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब पवार सचिव हरिभाऊ ठोंबरे, नवनिर्वाचित नगरसेविका वैशालीताई माशाळकर, पंचायत समिती सदस्या अमृता ताई गिरमकर, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष डॉ. राजेश दाते जिजामाता हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय आढाव, संस्थेचे मुख्याध्यापक लक्ष्मण दुधाट, पालक प्रतिनिधी स्वातीताई दत्ता होले, आदींचे हस्ते करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कलागुणाचा अतिशय सुंदर प्रकारे सादरीकरण करून पालक वर्ग व पाहुण्यांचे चांगल्या प्रकारे करमणूक केली, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपदा दुधाट तर स्नेहसंमेलन प्रमुख श्रेया जाधव या होत्या.

## भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था कडून आयएटी २०२६ जाहीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (आयआयएसईआर) यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी 'आयआयएसईआर योग्यता परीक्षा' (आयएटी) २०२६ जाहीर करण्यात आली आहे. देशातील सातही आयआयएसईआर संस्थांमध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश केवळ आयएटी गुणांच्या आधारे दिला जाणार असून, संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) गुणांवर यावर्षी प्रवेश दिला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ऑनलाइन अर्ज प्रक्रिया ५ मार्च २०२६ पासून सुरू होणार असून अर्ज करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल २०२६ आहे. परीक्षा ७ जून २०२६ (रविवार) रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येणार आहे. नोंदणी व अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ https://www.iiseradmission.in/ ला भेट




देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रो. सुनील एस. भागवत, संचालक, आयआयएसईआर पुणे म्हणाले, "जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि अत्याधुनिक संशोधनात कार्यरत प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वातावरण मिळते. पुण्यातील शैक्षणिक व संशोधन संस्था तसेच उद्योग क्षेत्राच्या सान्निध्यामुळे विद्यार्थ्यांना प्रगतीची व्यापक संधी उपलब्ध होते."

# जुगार अड्ड्यावर छापा

**आलीशान मोटारींसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील ठाकूर पिंपरी गावातील शिवलेवस्ती येथे सुरू असलेल्या बेकायदा तीनपत्ती जुगार अड्ड्यावर खेड पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत १० संशयीत आरोपींसह १५ ते २० जणांना जुगार खेळताना ताब्यात घेण्यात आले असून सुमारे २८ लाख १८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. खेड तालुक्यात अवैध धंद्याविरोधात गेल्या अनेक वर्षांपासूनची ही मोठी कारवाई झाल्याची चर्चा आहे. ठाकूर पिंपरी येथील बाळू विष्णू शिवले यांच्या पत्राशेडमध्ये जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर खेडचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण



यांच्या मार्गदर्शनाखाली खेड पोलीस ठाण्याच्या पथकाने सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास तेथे छापा टाकला. पोलिस हवालदार सुनील ज्ञानेश्वर बांडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी संशयीतांकडून अंगझडतीदरम्यान रोख रक्कम व पत्ते जप्त करण्यात आले. त्यामध्ये सतिश धोतरे, शंकर धोतरे, दिगंबर परांडे, धनंजय भिसुरे, ब्रह्मानंद माळी, संतोष पवार, रोहित धोतरे आदींचा समावेश आहे. यांच्याकडून प्रत्येकी ५०० ते १,००० रुपयांदरम्यान रोख रक्कम आणि तीनपत्तीचे पत्ते जप्त करण्यात आले. तसेच ठिकाणी ठेवलेल्या पत्त्यांच्या डेकमधून ३३ पत्तेही जप्त करण्यात आले. या कारवाईदरम्यान १० पत्त्यांचे कॅट, जुगारासाठी वापरलेले ५ गोल टेबल, ४० खुर्च्या आणि मोठ्या प्रमाणावर वाहने जप्त करण्यात आली. एकूण ४० हून अधिक वाहनांमध्ये दोन फॉर्च्यूनर, एक इनोव्हा, स्विफ्ट, आय-२०, बलेनो, सँट्रो, वॅगनआर यांसारख्या कार तसेच स्प्लेंडर, पॅशन, ॲक्टिव्हा, शाईन यांसारख्या दुचाकींचा समावेश आहे. तर दोन रिक्षाही जप्त करण्यात आल्या.

**पोलिसांच्या माहितीनुसार, या जुगार अड्ड्याचे मुख्य आयोजक म्हणून बाळू शिवले, बाबू ढमाले आणि नवनाथ धोत्रे यांची नावे समोर आली आहेत. स्थानिक नागरिकांना या अड्ड्यामुळे त्रास सहन करावा लागत असल्याची माहिती असून भीतीमुळे कोणी तक्रार करण्यास धजावत नव्हते. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही धडक कारवाई केली. पुढील तपास सुरू असून आणखी काही संशयितांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.